# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.11.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

संविधान स्वीकृतीच्या अमृत महोत्सवी वर्षाला प्रारंभ, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार

राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी; राज्यात दोन रेल्वे मार्गिकांनाही मान्यता

भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा पंतप्रधानांचा विश्वास

आणि

बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर 295 धावांनी विजय

**संविधान दिवस**

भारतीय राज्यघटना दिन आज देशभरात सर्वत्र साजरा होत आहे. 75 वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्यानिमित्त आजपासून वर्षभर विविध कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे. 26 नोव्हेंबर 1949 मध्ये संविधान सभेत भारताचं संविधान मांडलं गेलं होतं आणि 26 जानेवारी 1950 ला लागू करण्यात आलं. आज संविधान दिवसांच्या निमित्तानं दिल्लीत संविधान सदानातील मध्यवर्ती सभागृहामध्ये एका भव्य समारंभाचं आयोजन करण्यात आलं असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार आहेत. याप्रसंगी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह दिल्लीमधील सर्व दूतावसांचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. संविधान दिवसाचं औचित्य साधून एका नाण्याचं आणि टपाल टिकीटाचं अनावरण आणि दोन पुस्तकही प्रकाशित करण्यात येणार आहेत. आज संध्याकाळी संविधान दिवसांच्या निमित्तानं सर्वोच्च न्यायालयानं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत एका कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. या कार्यक्रमात मोदी उपस्थितांना संबोधित करतील.

**मंत्रिमंडळनिर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल नैसर्गिक शेती, रेल्वे आणि तरुणांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असे विविध निर्णय घेतले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव वार्ताहरांशी बोलताना याबाबत माहिती दिली. रेल्वे मंत्रालयाच्या 7927 कोटी रुपयांच्या तीन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. मनमाड-जळगाव या 160 किलोमीटरच्या चौथ्या रेल्वे मार्गिकेचा, तसंच भुसावळ- खांडवा दरम्यानच्या मार्गिकेचा यात समावेश आहे. नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन सुरू करण्यात येणार असून त्यासाठी 2481 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आला. या मिशनमध्ये एक कोटी शेतकऱ्यांना सामावून घेतलं जाईल. 2750२ हजार 750 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**मंत्रि मंडळनिर्णय**

याच बैठकीत काल प्राप्तीकर विभागाच्या पॅन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्यात आली; यासाठी 1 हजार 435 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सद्यस्थितीतली व्यवस्था अद्ययावत करून त्यासाठी एकत्रित पोर्टल तयार करण्यात येईल. सध्याचा पॅन क्रमांक तोच राहिल मात्र त्याची मजबूत सुरक्षा व्यवस्थाही असेल असं वैष्णव यांनी सांगितलं.

**अधिवेशन**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, अदानी उद्योग समूहाच्या कथित लाचखोरीच्या मुद्दयावरुन विरोधकांनी दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ केला. त्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी दोन्ही सदनांमध्ये दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. आज संविधान दिनानिमित कामकाज होणार नाही; उद्या, दोन्ही सभागृहांच्या कामाला प्रारंभ होईल. दरम्यान, संसदेत विधायक, अर्थपूर्ण चर्चा झाली पाहिजे. अधिकाधिक खासदार चर्चेत सहभागी झाले पाहिजेत, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. ते काल अधिवेशनापूर्वी संसद भवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**सहकार परिषद**

भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सहकार क्षेत्र म्हणजे भारतीय संस्कृतीचा पाया आहे. भारतात सहकारी संस्थांची संकल्पना ही आता चळवळ बनली आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. पंतप्रधानांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष 2025 निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशनही झालं. भूतानचे पंतप्रधान दाशो शेरिंग तोबगे आणि फिजीचे उपपंतप्रधान मनोआ कामिकामिका हे या परिषदेला

उपस्थित आहेत. सहा दिवस चालणाऱ्या परिषदेत जगभरातील सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

**इस्रायल युद्धविराम**

इस्रायल आणि लेबनॉन यांच्यादरम्यान तेल अवीव इथं इस्रायल डिफेन्स फोर्सेसच्या किरिया मुख्यालयात आज चर्चा होण्याची शक्यता आहे. स्थानिक माध्यमांच्या अहवालानुसार, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याकडून तत्वतः मंजुरी दिली आहे. काल रात्री इस्रायली अधिकाऱ्यांशी सुरक्षेबाबत चर्चा केल्यानंतर हिज्जबुल्लासह युद्धविरामाच्या संभाव्य मंजुरीवर स्वाक्षरी केली आहे. नेत्यन्याहू यांच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, इस्रायल मंत्रिमंडळ प्रस्तावित करारावर आज मतदान करेल आणि तो मंजूर होण्याची अपेक्षा आहे. मात्र काही तपशीलांवर इस्रायलचा आक्षेप असून त्यावर वाटाघाटी सुरू आहे. सर्व समस्यांचे निराकरण होईपर्यंत करार अंतिम होणार नसल्याचंही या प्रवक्त्यानं स्पष्ट केलं.

**नयी चेतना**

सरकार महिलांच्या समाजिक,आर्थिक,राजनैतिक आणि शैक्षणिक सशक्तीकरणासाठी काम करत असल्याचं ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे ,काल त्यांच्या हस्ते नयी चेतना कार्यक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये 13 राज्यात 227 केंद्राचं उद्घाटन करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. देशातील स्त्रियांवर होत असलेल्या अत्याचारांवर आपण आवाज उठवला पाहिजे असंही त्यांनी सांगितलं. महिनाभर चालणाऱ्या या अभियायनाची 23 डिसेंबरला सांगता होणार आहे. एक साथ-हिंसे विरुद्ध-एक आवाज असं या अभियानाचं ब्रीद वाक्य आहे. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दीनदयाळ अंत्योदय योजना आणि राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन यांच्यातर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**मुंबई गांजा**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानतळ तपास अधिकाऱ्यांनी, दोन प्रवाशांकडून 22 किलोपेक्षा जास्त अमली पदार्थ जप्त केले. खाद्यपदार्थांच्या पाकिटात लपवून या पदार्थांची तस्करी केली जात होती.

**बुद्धिबळ**

सिंगापूरमध्ये सुरू असलेल्या बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या फेरीत भारताच्या डोम्माराजू गुकेश याला पराभवाला सामोरे जावे लागले. जागतिक विजेता डिंग लिरेनकडून गुकेश पराभूत झाला आहे. स्पर्धेत 14 फेऱ्या होणार आहेत. साडेसात गुण मिळवणारा स्पर्धक विजेता ठरणार आहे.

**बास्केट बॉल**

चेन्नई इथं सुरू असलेल्या फीबा आशिया चषक बास्केटबॉल स्पर्धेत भारतानं सर्वोच्च संघ असलेल्या कझाकिस्तानवर 88-69 असा विजय मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली. फीबासारख्या स्पर्धेत 27 वर्षात पहिल्यांदाच भारतानं कझाकिस्तानवर विजय मिळवला आहे. सामन्याच्या पहिल्या अर्ध्या वेळेत भारतानं 37-33 अशी आघाडी घेत तिसऱ्या डावात 19 गुणांनी विजय मिळवला. भारताच्या प्रणव प्रिन्स आणि कन्वर संधु यांनी प्रत्येकी 17 गुणांची खेळी केली.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट संघाने बॉर्डर-गावसकर चषकाच्या पहिल्या कसोटी सामन्यात काल चौथ्या दिवशी पर्थवर ऑस्ट्रेलियाचा पराभव करून 5 सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध 3-0 असा पराभव पत्करल्यानंतर अनुभवी रोहित शर्मा संघात नसताना नितीशकुमार रेड्डी आणि हर्षित राणा यांसारखे नवखे गोलंदाज बरोबर घेवून जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारताने ऑस्ट्रेलियाचा 295 धावांनी पराभव करून इतिहास रचला आहे. तत्पूर्वी दुसऱ्या डावात यशस्वी जयस्वाल आणि के एल राहुलच्या पहिल्या गड्यासाठी केलेल्या 201 धावांच्या भागीदारीमुळे भारतीय संघाचे मनोबल वाढले. त्यानंतर विराट कोहलीने शतक ठोकत धावांचा डोंगर रचला. दुसऱ्या डावात 487 धावा करत पहिल्या डावातील आघाडीसह 533 धावांचं आव्हान ऑस्ट्रेलियापुढे ठेवलं होतं. अखेर त्यांना 238 धावांपर्यंत मजल मारता आली. दुसऱ्या डावात डोकेदुखी ठरत असलेल्या ट्रेव्हिस हेडने 89 धावांची चिवट खेळी केली. बुमराहने त्याचा अडसर दूर केला. दोन्ही डावात मिळून 8 बळी घेणारा जसप्रीत बुमराह सामनावीर ठरला. मोहम्मद सिराजने 3 तर नितीशकुमार रेड्डी आणि हर्षित राणाने प्रत्येक 1 बळी घेतला. तर वॉशिंग्टन सुंदरने 2 बळी घेतले. या विजयासह भारताने जागतिक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या गुणतालिकेत पुन्हा एकदा अव्वल स्थान गाठलं आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पात्र होण्यासाठी उर्वरित 4 सामने जिंकावे लागतील किंवा 3 सामने जिंकून 1 सामना अनिर्णित राहिला तर भारतीय संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरेल. दुसरा कसोटी सामना ॲडलेड येथे 6 ते 10 डिसेंबर दरम्यान खेळवला जाणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.

**हवामान**

देशात तामिळनाडू, पुद्दुचरी आणि कराईकलमध्ये विविध ठिकाणी तसंच केरळ, माहे, आंध्रच्या किनारपट्टी, यानममध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर येत्या चार दिवसांत राजस्थान वगळता उत्तर-पश्चिम भारतात किमान तापमानात 2 ते 3 अंशांनी घट होण्याचा अंदाज वर्तवला आहे. तर हिमाचल प्रदेशात पहाटेपर्यंत दाट धुक्याची शक्यता वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**